# वाढत्या लोकसंख्येमुळे मेट्रोचा नेव्हीनगरपर्यंत होणार विस्तार

## वाहतूक तज्ज्ञांच्या विरोधानंतर मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे स्पष्टीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नेव्हीनगर परिसरात वाढती लोकसंख्या व पुनर्विकास प्रकल्पांमुळे पुढील काळात सार्वजनिक वाहतूक सेवेवर भार पडेल. हा भार कमी करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत मेट्रो लाइन-३ चा विस्तार कफ परेड स्थानकापासून नेव्हीनगरपर्यंत करण्यात येणार आहे, असे स्पष्टीकरण मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आले आहे.

रिक्षा आणि बसपेक्षा मेट्रोचा प्रवास इतर सार्वजनिक वाहतुकीपेक्षा महाग आहे. तो सर्वसामान्यांना परवडणारा नाही. त्यामुळे त्यांच्या खिशावर ताण पडत आहे. मेट्रो ३ च्या विस्तारासाठी लागणारे हजारो कोटी रुपये मुंबईतील आवश्यक पायाभूत सुविधांवर खर्च करणे गरजेचे आहे, असे सांगत वाहतूक तज्ज्ञ अशोक दातार यांनी विरोध केला. त्यानंतर मेट्रो प्रशासनाने स्पष्टीकरण केले आहे.

रक्षा मंत्रालयाने (नेव्ही) केलेल्या विनंतीनुसार केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाकडून याबाबतचा प्रस्ताव मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला पाठविण्यात आला होता, असेही मेट्रोकडून सांगण्यात आले.

कुलाबा - वांद्रे - सीप्झ दरम्यान सुरू होणाऱ्या मेट्रो-३ मार्गिकेचे कफ परेडहूनही पुढे नेव्ही नगरपर्यंत विस्तारीकरण करण्याचा निर्णय मेट्रो रेल कॉर्पोरेशनने घेतला आहे. मात्र, नेव्ही नगरमध्ये राहणाऱ्या निवडक लोकांसाठी ही मेट्रो मार्गिका वाढविण्याची गरजच काय, असा सवाल करत या खर्चाचा अपव्यय होणार असल्याचे मत वाहतूकतज्ज्ञांनी व्यक्त केले होते.

विस्तारीकरण झाल्यावर या भागातील विविध कार्यालये, आस्थापना, शाळेत जाणाऱ्यांसाठी तसेच भेट देणारे पर्यटक आणि नागरिकांना याचा लाभ होईल, अशी माहिती देण्यात आली.



### मेट्रो रेल कॉर्पोरेशनची तत्त्वत: मान्यता

नेव्हीने केलेल्या विनंतीनुसार केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाकडून याबाबतचा प्रस्ताव मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाच्या प्रकल्प अहवाल तयारीसाठी मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाने तत्त्वत: मान्यता दिली आहे.

### या विस्तारामुळे यांना होणार लाभ

वसाहत, शाळा, ८०० खाटांचे अश्विनी रुग्णालय, शैक्षणिक संस्था, टीआयआरएफ, भारतीय हवामान विभाग व विविध संस्थांची कार्यालये आहेत. येथील विद्यार्थी, नागरिक, संरक्षण दलाचे निवृत्त अधिकारी-कर्मचारी व पर्यटक यांना मेट्रो रेलच्या या विस्तारामुळे वाहतूक सुविधेचा लाभ होईल.